**<u>फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा</u>**

**<u>मराठीत पुरावा</u>**

**<u>अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ ची शपथेवर साक्ष</u>**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः संदिप केशव चोरगे,

वयः ५८ वर्षे, व्यवसायः शेती,

राहणारः खारापटी, ता. रोहा, जि.रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :</u>**

०१. दि.२३.०६.२०२० रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. सदर दिवशीचे पंचनाम्यावर माझी सही आहे. परंतू त्यातील मजकूर मला माहिती नाही.

**<u>साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२३.०६.२०२० रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच संदेश डोलकर याला मौजे खारापटी येथे पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते, घटनास्थळ आम्हाला फिर्यादी सौ. निशा चोरगे हिने दाखविले होते, त्या ठिकाणी फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये घराचे जागेचे कारणामुळे वाद झाला होता, तेथून पोलिसांनी माझे समक्ष लाकडी दांडा असलेला पावडा व दगड जप्त केला होता, सदर वस्तुंवर पोलिसांनी माझे सहया घेवून लेबल लावले, त्यांनी तेथे माझे समक्ष दिसत्या परिस्थीतीप्रमाणे पंचनामा तयार केला, त्यावर मी

वाचून सही केली.

०३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे नावेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी त्यांना वाचविण्याकरीता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम.के.शिंदे यांनी नाकारला.**

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरी/–
(एस. एस. महाले)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.

स्थळ : रोहा.
दि.२४.११.२०२३

(टिप – डिजीटल स्वाक्षरीची मुदत संपल्यामुळे प्रस्तूतचा दस्त डिजीटल स्वाक्षरीने सही केलेला नाही.)